# यशवंतराव चव्हाण आणि पंचायत राज

**विश्वजीत सुनिल पाटील** पी. एच. डी. संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र विभाग सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, गणेशखिंड, पुणे ४११००७ मो.:- ८२७५३९२०६६ ईमेल:- vishwjeetshailajasunil@gmail.com

---

"विकेंद्रीकरण हा लोकशाहीचा गाभा असून, ते झाल्यानंतर एका पातळीवर केंद्रीभूत झालेली सत्ता खेडयांच्या पातळीपर्यंत पोहचेल"- यशवंतराव चव्हाण

महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव बळवंतराव चव्हाण यांचा जन्म 12 मार्च 1913 रोजी देवराष्ट्र जिल्हा सांगली येथे शेतकरी कुटुंबात झाला. त्याचे प्राथमिक शिक्षण कराड येथे घेऊन उच्च शिक्षण कोल्हापूर व पुणे येथे घेतले. विद्यार्थी जीवनापासून यशवंतराव स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाल्याने त्यांचे राजकीय सामाजिकीकरण घडून आले. 1930 मध्ये यशवंतरावांनी राजकारणात सहभाग नोंदविला. भास्करराव जाधव हे तेव्हाच्या मुंबई लेजिस्लेटिव कौन्सिलचे उमेदवार म्हणून उभे होते, त्यांच्या प्रचारकार्यात यशवंतराव एक स्वयमसेवक म्हणून कार्य करू लागले . 1937 च्या निवडणुकीत त्याच्या राजकीय जीवनाचा पाया तयार झाला. 1942 च्या स्वातंत्र्यलढ्यात सातारा जिल्हयातील 'पत्नी सरकारच्या कार्यात सहभागी होऊन यशवंतरावांची लोकशाही वरील निष्ठाव वैचारिक बैठक पक्की झाली.टिळक, गांधी, नेहरू, फुले, शाहू महाराज या सर्वांच्या राजकीय आणि सामाजिक विचारांचा संयोग यशवंतरावांच्या मनामध्ये झाला होता.

1946 पर्यंत यशवंतराव स्वातंत्र्य आंदोलनात सक्रिय होते. 1946 च्या निवडणूकीनंतर त्यांचा महाराष्ट्राच्या सत्ताकारणात प्रवेश झाला. सातारा जिल्हा दक्षिण मतदार संघातून निवडणुकीस उभे राहिले आणि यशस्वी झाले. 1946 मध्ये गृह खात्याचे पार्लमेंटरी सेक्रेटरी म्हणून सूत्रे स्वीकारली. 1946 मध्ये पार्लमेंटरी सेक्रेटरी झाल्यानंतर त्यांनी आपल्या पदाचा उपयोग ग्राम विकास कामासाठी करण्याचा प्रयत्न केला. 1952 च्या सार्वत्रिक निवडणूकीत यशवंतराव आमदार म्हणून निवडून आले.तत्कालीन मुख्यमंत्री मोराजजी देसाई यांनी यशवंतरावां कडे नागरी पुरवठा खात्याची जबाबदारी दिली. पुढे यशवंतरावांकडे स्थानिक स्वराज्य व विकास खाते देण्यात आले. यात त्यांनी खूप रस घेऊन नवनव्या कल्पना राबविल्या. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या छोटया छोटया परिषदा घेऊन त्यात आपल्याअडचणीची चर्चा करावी असा सल्ला दिला. पुढे1954 साली मुंबई ग्रामपंचायत संघाची स्थापना यशवंतरावांच्याच साह्याने झाली.

मे 1960 रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. नवीन महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री होण्याची संधी यशवंतरावा चव्हाण यांना मिळाली. संयुक्त महाराष्ट्राची निर्मीती झाल्यानंतर एकसंघ समाजाची उभारणी करणे हे त्यांच्यासमोरील मोठे आव्हान होते. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मीतीनंतर मुख्यमंत्री या नात्याने महाराष्ट्राचा सर्वागीण विकास व्हावा यासाठी जनतेत जागृती करून निर्माण करून विकासाच्या विधेयक कामासाठी जनतेची मते आणि मनगटे तयार करण्यावर भर दिला. धोरणात्मक निर्णय घेतले व विकास कामांसाठी आर्थिक मदत उपलब्ध करून देण्याची तयारी केली. जनतेच्या सहकार्याबरोबर प्रशासनातील अधिकाऱ्यांच्या सकारात्मक मदतीचा वाटा तेवढाच महत्वाचा असल्याने यशवंतराव चव्हाण यांनी प्रशासनाचे परंपरागत स्वरूप बदलण्याचा प्रयत्न केला. यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून ज्या काही प्रमुख प्रश्नांची जबाबदारी सरकारने स्वीकारली त्यात लोकशाही विकेंद्रीकरणाचा प्रश्न अंतर्भाव होता.

**लोकशाही विकेंद्रीकरण आणि पंचायत राज:-**

भारतात प्राचीन काळापासून स्थानिक स्वराज्य संस्थेचा उल्लेख ग्रामपंचायत व प्रतीचित पंचाच्या स्वरुपात दिसून येतो. इंग्रजांच्या मुलकी प्रशासन व्यवस्थेतून त्याला नवे रूप प्राप्त होण्यास मदत झाली. इंग्रजांच्या प्रशासनातील सत्ता विकेंद्रीकरणाची सूत्रे भारतीय पंचायत राज व्यवस्थेशी समरूप अशी होती. इ.स. 1870 मध्ये सर्वप्रथम लॉर्ड मेयो यांनी विकेंद्रीकरणाचा प्रस्ताव मंजूर केला होता. सदर प्रस्तावात स्वशासनाच्या विकासाबरोबरच स्थानिक संस्थांना सशक्त बनविण्याचे प्रयत्न झाले होते. पुढे 1885 मध्ये व्हाईसरॉय लॉर्ड रिपन यांनी प्रशासनाला पुनरुज्जीवित करण्याचा प्रयत्न केला. इंग्रजांनी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या व पंचायतराज व्यवस्थेच्या सत्ता विकेंद्रीकरणाच्या दृष्टी- कोणातून 1907 मध्ये राजकीय विकेंद्रीकरण आयोगाची स्थापनाकेली. 1919 च्या मॉन्टेंग्यू चेम्सफोर्ड कायदयानुसार आठ प्रांतामध्ये स्वायत्तेचे विधेयक पारित करण्यात आले. त्यामध्ये 1919 मध्ये बिहारमध्ये बिहार स्वायत अधिनियम, 1920 मध्ये उत्तरप्रदेश ग्रामपंचायत अधिनियम,इत्यादी.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतीय संविधानात मार्गदर्शक तत्वामध्ये अनुच्छेद 40 मध्ये नमुद करण्यात आले की, "राज्य है, ग्रामपंचायती संघटित करण्यासाठी उपाययोजना करील व त्यांना स्वराज्याचे मुळघटक म्हणून कार्य करण्यास समर्थ करण्यासाठी आवश्यक असतील असे अधिकार व प्राधिकारबहाल करील.पंचायतीराज व्यवस्थेच्या बळकटीकरणातून सत्तेचे विकेंद्रीकरण करण्याच्या उद्देशाने अनेक कार्यक्रम स्वातंत्र्य भारतात राबविले गेले. त्यात सामुदायिक विकास कार्यक्रमाच्या निमित्ताने पहिले पाऊल टाकले गेले. सामुदायिक विकास कार्यक्रमाचा मूळ उद्देश 'अधिकाधिक लोकांचे अधिकाधिक कल्याण करणे' हे होते. ही योजना नोकरशाहीच्या माध्यमातून राबविल्यामुळे आणि जनतेच्या असहकार्यामुळे हा कार्यक्रम यशस्वी होवू शकला नाही.

स्थानिक नेतृत्वाचा उपयोग करून आर्थिक विकास करण्यासाठी 1956 साली केंद्र सरकारने बलवंतराय मेहता यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली. याच दृष्टीने राज्यात सर्व बाजूंनी विचार करण्यासाठी यशवंतराव चव्हाण मुख्यमंत्री असताना वसंतराव नाईक यांच्या अध्यक्षतेखाली जुन 1960 रोजी समिती स्थापन केली.

**यशवंतराव चव्हाण आणि लोकशाही विकेंद्रीकरण :**

खेडे हे केंद्रस्थान मानून गावागावापर्यंत लोकशाही नेण्यासाठी पंचायत पद्धती आणण्यावर पंडित नेहरूंचा भर होता. बलवंतराय मेहता समितीने केलेल्या शिफारशी काही राज्यांनी प्रत्यक्षात आणल्या. मात्र यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्राला अनुरूप अशी व्यवस्था निर्माण करायची असल्याने वसंतराव नाईक यांच्या अध्यक्षतेखाली एक समिति नेमली. समितीच्या शिफारशीनुसार महाराष्ट्राने स्वतंत्र पंचायत राज विधेयक आणले. 8 डिसेंबर 1961 रोजी ते विधिमंडळात संगत केले आणि 1 मे 1962 पासून प्रत्यक्ष अमलात आणले गेले.लोकशाही विकेंद्रीकरण समितीवरील अध्वान चर्चेच्या वेळी विधिमंडळात उत्तर देताना यशवंतराव चव्हाण म्हणतात की, “माझ्या स्वतःपुरतेच बोलावयाचे झाल्यास मी असे म्हणेन की सेंट्रलायजेशनचा शोकीन नाही, पण डीसेंट्रलायजेशनचा शोकीन मात्र आहे कारण लोकशाहीतत्त्वाचा तो मूळ गाभा आहे, जी सत्ता केंद्रित झालेली आहे तिचे विकेंद्रीकरण करण्यात आले पाहिजे, विकेंद्रीकरणा- नंतर खालच्या पातळीवर जिल्हा, तालुका, खेड्यापर्यंत पोहचेल. अर्थात ती लोकांच्या प्रतिनिधीमध्ये विभागली गेली पाहिजे, अशा प्रकार यशवंतराव चव्हाण लोकशाहीवाशत्व निष्ठाव्यक्तकरताना दिसतात.

लोकशाही विकेंद्रीकरणांचा प्रयोग हा एक धोका आहे अशी शंका काळजी काहींना वाटत होती. खेड्यापाड्यातील ग्रामपंचायतींना सत्ता देण्याची फारशी आवश्यकता नाही. खेडयापाडयातील ग्रामपंचायती म्हणजे निव्वळ अडाणी माणसांच्या हातात जाणाज्या संघटना असून त्यात थोडासा जातीयवाद आणि सरंजामशाही वृली आहे त्याप्रमाने खेडयात थोडेसे गुंडगिरीचे वातावरण असते अशा लोकांच्या हाती लोकशाही विकेंद्रीकरणाची सत्ता दिल्याने काय घडणार आहे ? असा विचार करणाऱ्यांना पण यशवंतराव ठणकावून सांगतात की, लोकशाही सुदृढ करायची असेल तीविचार रुजवायचा असेल तर सत्तेचे विकेंद्रीकरण करणे गरजेचे आहे. महाराष्ट्र राज्यातील पंचायत राज व्यवस्था इतर राज्याच्या तुलनेत जास्त यशस्वी ठरली. 1952 ते 56 या काळात यशवंतराव चव्हाण स्थानिक स्वराज्य संस्था विभागाचे मंत्री होते या काळात त्याचा अनुभव महाराष्ट्राला उत्तम पंचायत राज व्यवस्था देण्यात झाला. या पद्धतीमुळे सत्ता केवळ केंद्र वा राज्यातल्या नेतृत्वांच्या हाती केंद्रीत न होता, ती गावपातळीपर्यंत विभागली गेली, निर्णय घेण्याचा अधिकार आणि ते प्रत्यक्षात आणण्याची प्रशासकीय व्यवस्था गावपातळीपर्यंत तयार झाली.

आज आपण यशवंतराव चव्हाणयांनीविकेंद्रीकरणाचे टाकलेले पाऊल लोकशाही वाढविण्याच्या बळकटीकरणाच्या दृष्टीनेयोग्य होते,असे म्हणावयासकाही हरकत नाही.आजलोकांनी ह्यासंस्थांमध्ये चांगल्या प्रकारे सहभाग नोंदविकेला आपल्याला पाहिला भेटतो, यासोबतच या रचनेने महाराष्ट्राला मोठी देणगी दिली ती म्हणजे स्थानिक नेतृत्वाचा उदय. केवळ उच्चवर्णीय वा धनाढ्य वा राजकारणात स्थिरावलेल्या कुटुंबांनाच नेतृत्व करता येईल असा समज आणि रचना या नव्या पद्धतीन मोडून काढली. गावपातळीवरून पंचायत पद्धतीत नेतृत्व पुढे येऊ लागली. ती एक संसदीय पद्धतीची शाळा बनली, त्या प्रक्रियेतून मोठ झालेल्यांनी पुढे महाराष्ट्राचं नेतृत्व केलं. आजही महाराष्ट्रातील बरेचरी आमदारांची सुरुवात ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषदसदस्य म्हणून झालेली असते. या निर्माण केलेल्या व्यवस्थेत वेगवेगळेविचार, धर्म-जातीच्या लोकांना राजकारणाच्या प्रवाहात आणून त्यांना सामाजिक दिशा देण्याचे फार मोलाचे कार्य यशवंतरावांनी केले. पंचायत राजची स्थापना झाल्यावर जिल्हा परिषदांमध्ये अध्यक्ष व अन्य पदाधिकारी निवडताना सर्व जाती-जमातीना विशेषतः मागासवर्गीय जातींना योग्य प्रतिनिधित्व मिळावे असा यशवंतराव चव्हाणा यांचा खास आग्रह होता.

स्वातंत्र्योत्तर काळात लोकशाहीमध्ये लोकांनाकायदयाच्या अंमलबजावणीमुळे ग्रामीण भागातून नवीन नेतृत्व उदयास येण्यास चालना मिळाली. लोकशाहीचे योग्य प्रशिक्षण मिळाले. जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायती यांच्या माध्यमातून महाराष्ट्रात नव्या दमाच्या कार्यकर्त्यांच्या पिढ्या तयार होऊ लागल्या लोकशाही शासनव्यवस्था दृढमूल होण्यासाठी या सत्तेच्या विकेंद्रीकरणाचा फार चांगला उपयोग झाला. स्वातंत्र्योत्तर काळात लोकशाही मध्ये लोकांना सहभागी करून घेणे, त्यांना लोकशाहीचे प्रशिक्षण देण्याच्या हेतूने आणि लोकशाही बळकट करण्याच्या दृष्टीने सत्तेचे व विकेंद्रीकरण केले गेले.

राज्यकर्त्यांच्या दृष्टीतूनच राज्य घडत असते, ही वस्तुस्थीती आहे राज्य संभाळणे, राज्य चालविणे यापेक्षा राज्य घडविणे ही बाब यशवंतरावांना अधिक महत्वाची वाटते.

**संदर्भ**.

1) Maharashtra Legislative Assembly debates, Vol. III part II page – 2072 to 2074
2) काले बाबुराव, 'यशवंतराव द्वीतीय आवृली 1965 चव्हाण गी. य. रावणे प्रकाशन, पुणे
3) भोळेभा. ल, यशवंतराव चव्हाण राजकीय आणि ससामाजिक संकेत प्रकाशन, औरंगाबाद, 1985
4) खोबरेकर व्ही.जी (संपा.), यशवंतराव चव्हाण विधिमंडळातील निवडक भाषणे', 1946 ते 1962 खंड-1, प्रकाशन यशवंतराव चव्हाण प्रतिकान, मुंबई पहिली आवृली 1989 .
5) कुलकर्णी एस. के, लोकोत्तर लोकनेता, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे
6) Maharashtra Legislative Assembly Debates,
Vo III, Port II Page 12172224
7) Karsik D.B, Y. B. Chavan. A Political Biographyy United Asia Publication, Bombay, March 1972
8)डॉ. विश्वास मेहेंदळे यशवंतराव चव्हाण ते पृथ्वीराज चव्हाण, अनुबंध प्रकाशन, पुणे चौथी आवृली ऑगस्ट 2012.